प्रेस नोट

दिनांक - २७/०६/२०२५

भारतात अवैध घुसखोरी केलेले ०७ बांग्लादेशी नागरिक अटक

एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, मुंबई गु.र.क्र.- ४२१/२०२५, नियम ३ सह ६ पारपत्र (भारतात प्रवेश) नियम १९५० सह परिच्छेद ३(१) परकीय नागरीक आदेश १९४८ सह कलम १४ परकीय नागरीक कायदा १९४६. या गुन्हयात ०१ पुरूष व ६ महिला असे एकुण ०७ बांग्लादेशी नागरिकांना अटक केलेबाबत.

दि.२४/०६/२०२५ रोजी अशी गोपनीय माहिती प्राप्त झाली की, एमआयडीसी पो.ठाणे हददीत ०१ बांग्लादेशी इसम आलेला असून त्याच्या संपर्कात वेगवेगळया शहरातील इतर बांग्लादेशी घुसखोर आहेत. प्राप्त माहितीची खातरजमा करून पुढील कारवाई करण्याकरिता मा. डॉ.शशिकांत भोसले, सपोआ, अंधेरी विभाग, मुंबई यांचे नेतृत्वात एमआयडीसी पो.ठाणेचे दहशतवाद विरोधी पथकाचे पोउनि महादेव जगताप व दहशतवाद विरोधी पथकास सोबत घेवुन वर नमुद ठिकाणाहुन इसम नामे बायजीद अयुब शेख यास ताब्यात घेवुन चौकशीकरिता एमआयडीसी पोलीस ठाणेस आणले. त्याच्याकडे केलेली चौकशी व प्राप्त ओळखपत्रांच्या आधारे तो बांग्लादेशी नागरिक असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे त्यास सदर गुन्हयात अटक करण्यात आली. तसेच त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता त्याने त्याच्या निवेदनात सांगितले की, तो काही बांग्लादेशी महिलांना अंधेरी, मुंबई या परिसरात भेटणार आहे. त्यामुळे दहशतवाद विरोधी पथकासह जेव्हीएलआर लिंक रोड, अंधेरी पुर्व मुंबई या ठिकाणी गेले असता तेथे ०२ संशयित महिला मिळुन आल्या. त्यांच्याकडे केलेल्या अधिक चौकशीमध्ये व त्यांच्याकडे मिळून आलेल्या बांग्लादेशी नॅशनल आयडीवरून त्या बांग्लादेशी नागरिक असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे त्यांना देखील अटक करण्यात आली.तसेच अटक आरोपी बायजीद शेख याने काहि बांग्लादेशी महिला पुणे या ठिकाणी पाठविल्या असुन त्या रूम नं.०२, चव्हाण बिल्डींग, दुगड फार्म हाऊस समोर, जैन मंदिराजवळ, कात्रज, पुणे. या ठिकाणी अवैध वास्तव्यासाठी आहेत. त्यामुळे गुन्हे प्रकटीकरण अधिकारी सपोनि यश पालवे, मपोउपनि धनश्री ठिंबरे व गुन्हे प्रकटीकरण पथक हे पुणे या ठिकाणी पुढील तपासकामी रवाना झाले.नमुद ठिकाणी गेल्यावर तेथे एकुण ०५ बांग्लादेशी माहिला मिळुन आल्या.त्यापैकी माहिला नामे इती अब्दुल शेख हिच्यावर नागपाडा पो.ठाणे, मुंबई या ठिकाणी अवैध वास्तव्याबाबत गुन्हा दाखल असुन तो न्यायाप्रविष्ट आहे. त्यामुळे तीस ताब्यात घेण्यात आले नाही. इतर ०४ माहिलांना ताब्यात घेण्यात आले.केलेल्या तपासावरून असे निष्पन्न झाले की,अटक बांग्लादेशी इसम बायजीद अयुब शेख हा मुंबई, पुणे यांसारख्या मोठया शहारांमध्ये बांग्लादेशी माहिलांना वेगवेगळया कामाकरिता अवैधरित्या पाठवित होता.

<u>अटक करण्यात आलेल्या अवैध घुसखोर बांग्लादेशी नागरिकांची नावे:-</u>

१) बायजीद अयुब शेख, वय ४७ वर्षे, धंदा-मजुरी, रा.ठी. - स्टॉर सिटी,नायगाव पुर्व,पालघर.
मुळ पत्ता- गाव. हमीदपुर, थाना-कालीया जि. नरेईल, देश- बांग्लादेश

२) नसरीन बेगम वय ३८ वर्षे रा.ठि. - कुर्ला,मुंबई मुळ पत्ता कदमतली, तहसिल जत्राबरी, ढाका, देश बांग्लादेश.

३) रोजीना अख्तर वय ३९ वर्षे रा. ठि. - कुर्ला मुळ पत्ता कुतुमपुर, नारायणगंज, देश बांग्लादेश.

४) काकोली अख्तर मो. नोबी हुसेन ब्रिष्टी, वय २५ वर्षे, रा.ठी. - रूम नं. ०२, ३ रा माळा, चव्हाण बिल्डींग, दुगड फार्म हाऊस समोर, जैन मंदिराजवळ, कात्रज, पुणे. मुळ पत्ता - गांव - बोरिसाल, थाना - दसपीना, जिल्हा ढाका, देश - बांग्लादेश.

५) रोमा बेगम मो. जिलानी मियॉ, वय ३१ वर्षे, रा.ठी. - रूम नं. ०२, ३ रा माळा, चव्हाण बिल्डींग, दुगड फार्म हाऊस समोर, जैन मंदिराजवळ, कात्रज, पुणे. मुळ पत्ता - गांव - कोटीआदी, थाना - भाजीपुर, जिल्हा किशारगंज, देश - बांग्लादेश.

६) पाखी बेगम मुशरफ हुसेन, वय २४ वर्षे, रा.ठी. - रूम नं. ०२, ३ रा माळा, चव्हाण बिल्डींग, दुगड फार्म हाऊस समोर, जैन मंदिराजवळ, कात्रज, पुणे. मुळ पत्ता - गांव - बॉईरोब, थाना - बॉईरोब, जिल्हा किशोरगंज, देश - बांग्लादेश.

७) कोहिनुर अख्तर उर्फ ऑलिजा अब्दुल मोनन शेख, वय २६ वर्षे, रा.ठी. - रूम नं. ०२, ३ रा माळा, चव्हाण बिल्डींग, दुगड फार्म हाऊस समोर, जैन मंदिराजवळ, कात्रज, पुणे. मुळ पत्ता - गांव - कोहिनुर, थाना - झाटवारी, जिल्हा - ढाका, देश - बांग्लादेश.

वर नमुंद अटक ०१ पुरूष व ०६ महिला बांग्लादेशी नागरिक हे सध्या न्यायालयीन कोठडी मध्ये आहेत. नमुद गुन्हयाचा अधिक तपास पोउनि महादेव जगताप करीत आहेत.

सदरची कामगिरी ही मा. श्री. देवेन भारती पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. श्री. सत्यनारायण चौधरी पोलीस सह आयुक्त (कावसु), मा. श्री. परमजीत सिंह दहिया, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रा. विभाग, मुंबई, मा.डॉ. शशि कुमार मीना, अपर पोलीस आयुक्त, उत्तर. प्रा. विभाग, मुंबई यांच्या आदेशान्वये मा. श्री. दत्ता नलावडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१०, मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. शशिकांत भोसले, सपोआ, अंधेरी विभाग, मुंबई यांच्या देखरेखीखाली प्रभारी वपोनि श्री. संजय चव्हाण, सपोनि यश पालवे, तपासी अधिकारी पोउनि. महादेव जगताप, मपोउपनि धनश्री ढेंबरे. पो.ह. मंडले, पुजारी, नलावडे, पो.शि. जाधव, माळी, पवार, देसाई, साळुंखे, जगताप यांनी यशस्वीरित्या पार पाडली.